आक्षेप सूचना

क्र. एफएलआर. १९८८/२७५३३/१९-ब.

प्रेषक,

आयुक्त, दारूबंदी व उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

राज्यातील सर्व देशी/विदेशी मद्ये
तयार करणा-या घटकांना.

विषय:- देशी/विदेशी मद्याची लेबले
मंजूर करण्याबाबत.

---

मुंबई, २९ नोव्हेंबर, १९८८.

महोदय,

विदेशी मद्याची लेबले उत्पादकांनी वापरण्यापूर्वी तत्संबंधीच्या नियमांतर्गत तरतुदींनुसार या कार्यालयाकडून ती मान्य करुन घ्यावी लागतात. अशी लेबले मान्य करताना या कार्यालयाच्या असे नजरेस आले आहे की, एखाद्या दारु निर्माणी कारखान्याला मंजूर करुन देण्यात आलेल्या लेबलांप्रमाणे तंतोतंत जुळतील अशी लेबले दुस-या विदेशी दारु निर्मात्यांनी त्यांच्या विदेशी मद्यासाठी मान्य करुन घेतली आहेत. त्यामुळे नावातील किरकोळ फरकाव्यतिरिक्त दोन्ही लेबले एकसारखी दिसत असल्यामुळे खरेदी करणारा संभ्रमात पडतो व ज्या निर्माणीच्या मालाला उठाव आहे, त्या ऐवजी दुस-या निर्माणीच्या साम्य असलेल्या लेबलांची मद्ये विकत घेतल्यामुळे सदर निर्माणीच्या मालाच्या विक्रीवर परिणाम होतो. अशाप्रकारच्या तक्रारीही या कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत. त्यामुळे या कार्यालयाने विदेशी वा देशी मद्याची लेबले मंजूर करुन देण्यासंबंधीच्या पध्दतीत खालीलप्रमाणे बदल केला आहे; याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

१. देशी/विदेशी मद्याची लेबले मंजूर करण्यासाठीचा प्रस्ताव या कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर ही लेबले आयुक्तांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावण्यात येतील व ती नोटीस बोर्डावर लावल्यापासून १५ दिवसांपर्यंत बोर्डावर ठेवण्यात येतील.

२. सदर लेबले मंजूर करण्यासंबंधात जर कोणा मद्य निर्मात्यांची किंवा इतर कोणाची हरकत असेल तर वरील १५ दिवसांच्या मुदतीत संबंधितांनी तसे आयुक्तांना कळविणे आवश्यक आहे.

३. १५ दिवसांच्या मुदतीत कोणाच्याही हरकती प्राप्त झाल्या नाहीत तर सदर लेबले नियमांतर्गत तरतुदींच्या निकषावर मंजूर करण्यात येतील.

४. यापुढे जी लेबले मंजूर करण्यात येतील ती लेबले मंजुरी दिल्यानंतर देखील कोणतेही कारण न सांगता नामंजूर करण्याचे अधिकार आयुक्तांनी राखून

ठेवले आहेत.

आपला विश्वासू,

[ म. ब. चौबे ]
आयुक्त, दारूबंदी व उत्पादन शुल्क,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

१. या कार्यालयातील सर्व उप आयुक्त व सहाय्यक आयुक्त.

२. सर्व अधीक्षक, दारूबंदी व उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य.

३. दारूबंदी व उत्पादन शुल्क प्रभारी अधिकारी.

अ] सर्व विदेशी दारू निर्मिती कारखाने.

ब] सर्व देशी दारू निर्मिती कारखाने.

४. या कार्यालयातील का. क्र. ४, ५, ११[अ] व १९ [पाच प्रती ]

सावंत. २५. ११. ८८